स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीसाठी सादर करावयाचा शोधप्रबंधाचा आराखडा

"गोपीनाथराव मुंडे यांच्या राजकीय कर्तृत्वाचा विश्लेषणात्मक अभ्यास"

संशोधक

परमेश्वर वैजनाथ मुंडे
एम.ए.(Uni-Merit) एम.फिल, नेट
यशवंत कॉलेज, नांदेड

मार्गदर्शक

प्रा.डॉ. कविता गंगाधर सोनकांबळे
एम.ए,बी.एड,नेट,पीएच.डी
राज्यशास्त्र विभाग
यशवंत कॉलेज, नांदेड

नोव्हेंबर : 2014

प्रस्तावना :-

ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून महाराष्ट्राच्या पटलावर बीड या जिल्ह्याला ओळखले जाते. वंजारी समाज हा पोटाची खळगी भरण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्या बरोबर कर्नाटक, गुजरात, आंध्रप्रदेश आदी राज्यात ऊसाच्या कामासाठी भटकंती करीत होता. अशा वंजारी समाजाच्या एका सामान्य कुटूंबात वडील पांडूरंग व माता लिंबाबाईच्या पोटी 12 डिसेंबर 1949 रोजी गोपीनाथराव मुंडे यांचा जन्म झाला."[1] "घरामधील कुटूंब हे वारकरी संप्रदायाशी संबंधित असल्यामुळे त्यांचे संस्कार गोपीनाथराव मुंडे वर झाले."[2] गरिबीवर मात करून आपल्या मुलाने उच्च शिक्षण घ्यावे अशी पांडूरंगाची ईच्छा होती. त्यामुळे गोपीनाथरावांना शिक्षणाकडे अधिक लक्ष्य देण्यास पांडूरंगानी सांगितले. "परंतु याच काळात महाविद्यालयीन शिक्षण सुरु असतांनाच गोपीनाथरावांच्या वडिलांचे निधन झाले. वडिलांचे निधन, कौटुंबिक दारिद्रय यामुळे शिक्षणात अडथळे येतील की काय? असे वाटत असतांनाच गोपीनाथरावांचा मोठा भाऊ पंडितअण्णा आणि लिंबाबाईने त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी उचलली."[3] शिक्षणाविषयी वडिलांची तळमळ गोपीनाथरावांनी पाहिली होती. म्हणून त्यांनी प्रत्येक समस्यांवर मात करत आपले शिक्षण सरुच ठेवले. "महाविद्यालयीन जीवनातच गोपीनाथरावांच्या नेतृत्व गुणांना वाव मिळाला. वर्ग प्रतिनिधी बनून आपल्यातील नेतृत्व क्षमता त्यांनी दाखविली."[4] पुढे याचा फायदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत झाला. "वर्ग प्रतिनिधी ते जिल्हा परिषद सदस्य, आमदार, प्रदेशाध्यक्ष, विधानसभा विरोधी पक्षनेता, उपमुख्यमंत्री, विधानसभा गटनेते, खासदार, लोकसभेतील उपनेता, लोकलेखा समीतीचे अध्यक्ष, भारताचे ग्रामविकास मंत्री अशा महत्त्वपूर्ण पदावर गोपीनाथराव मुंडे यांनी प्रभावी पणे भूमिका पार पाडली."[5] गोपीनाथराव मुंडे यांनी महाराष्ट्रातील शेतकरी, कामगारवर्गाला न्याय मिळवून देण्यासाठी धर्म व जातीयतेचे बंधन झुगारुन देऊन शोषणग्रस्त जनतेला आपले हक्क मिळवून देण्यासाठी सातत्याने चाळीस वर्ष संघर्ष केला. गोपीनाथराव मुंडे हे सत्तेत असो वा नसो सत्तेची लालसा न ठेवता सतत शेतकरी, कामगारवर्गाच्या समस्या सोडवण्यासाठी सतत प्रयत्नशिल राहिले. गोपीनाथराव मुंडे यांनी विरोधी पक्षनेते म्हणून विधानसभेत कोणकोणते प्रश्न

उपस्थित केले ? त्यांचा शासनाच्या ध्येय-धोरणावर काय परिणाम झाला ? उपमुख्यमंत्री पदी निवड झाल्यानंतर साडे चार वर्षाच्या कार्यकाळातील कोणकोणते निर्णय घेतले आहेत ? यांचा कितपत फायदा जनतेला झाला राष्ट्रीय राजकारणात सक्रिय झाल्यानंतर उपस्थित केलेले प्रमुख मुद्दे आदी कार्याचा लेखा-जोखा घेण्याचा प्रयत्न राहणार आहे.

संशोधन समस्या :-

राजकीय नेतृत्वाच्या जडण-घडणीमध्ये कौटुंबिक परिस्थिती, सामाजिक दर्जा, वारसा आदी घटकांचा प्रभाव पडत असतो. सामान्यपणे ज्यांची कौटुंबिक परिस्थिती जेमतेम असते आणि राजकीय वारसाही नसतो अशा कुटूंबातून राजकीय नेतृत्व घडणे दुर्मिळ असते. "गोपीनाथराव मुंडे हे दुर्मिळापैकी एक राजकीय नेतृत्व होते."[6] लोकशाही सशक्त राहण्यासाठी संघर्षशिल नेतृत्व असणे महत्त्वाचे असते. व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक असणारा संघर्षशिल बाणा, सत्यांवेषी दृष्टी, जनतेशी जैव नाते, लोकसमस्यांचा सुक्ष्म अभ्यास आवश्यक असतो. आज असे नेतृत्वगुण किती राजकीय नेत्यात आहेत हा संशोधनाचा विषय आहे.

संशोधनाचे महत्त्व :-

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेला विषय "गोपीनाथराव मुंडे यांच्या राजकीय कर्तृत्वाचा विश्लेषणात्मक अभ्यास" हा विषय निवडण्या मागची पार्श्वभूमी अशी आहे की, राजकीय पटलावर अनेक राजकीय नेते काळाच्या ओघात होऊन गेलेले आहेत. समकालीन परिस्थितीला प्रतिसाद देताना प्रत्येक राजकीय नेता आपले नेतृत्व विकसीत करीत असतो. परंतु क्वचितच नेत्याला लोकनेता म्हणून जनतेकडून गौरविण्यात येते. अशाच प्रकारचा मान गोपीनाथराव मुंडे यांना जनतेने बहाल केला आहे. जन कल्याणासाठी वेळोवेळी जनतेच्या समस्या, प्रश्न सोडवण्यासाठी अशा लोकनेत्यांची काय हातोटी होती ? यांचा येणाऱ्या पिढ्यांना बोध घेण्यासाठी महत्त्वाचे आहे. भविष्यकाळाचा अचूक वेध घेऊन उद्‌भवणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी लोकनेत्यांचे विचार मार्गदर्शक ठरत असतात. त्यामुळे अशा नेत्यांच्या विचारांचे समाजात आदान-प्रदान होणे महत्त्वाचे आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :-

प्रस्तुत अभ्यास विषय हाताळतांना संशोधकांने खालील उद्दिष्टे निश्चित केली आहेत.

1. कौटुंबिक पार्श्वभूमिचा आढावा घेणे.
2. गोपीनाथराव मुंडे यांच्या राजकीय नेतृत्व विकसीत होण्यास कारणीभूत ठरलेल्या घटकांचा आढावा घेणे.
3. गोपीनाथराव मुंडे विधानसभा सदस्य असतांना विधानसभेत उपस्थित केलेल्या प्रश्नाचा आढावा घेणे.
4. गोपीनाथराव मुंडे विरोधी पक्षनेते असतांना उपस्थित केलेल्या प्रश्नामुळे शासनाच्या ध्येय-धोरणावर कितपत परिणाम झाला हे जाणून घेणे.
5. गोपीनाथराव मुंडे युतीशासनाच्या कारकिर्दीत उपमुख्यमंत्री असतांना घेतलेल्या निर्णयाचा आढावा घेणे.
6. राष्ट्रीय राजकारणातील प्रवेश केल्यानंतर त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाचा लेखा-जोखा घेणे.

संशोधनाची गृहितके :-

1. गोपीनाथराव मुंडे हे ज्या हलाखीच्या कौटुंबिक परिस्थितीतून पुढे आले त्यामुळे संघर्षशिलता हा त्यांच्या जीवनाचा स्थायिभाव झाला.
2. गोपीनाथराव मुंडे यांचे राजकीय नेतृत्व विकसीत होण्यास विविध संघटना, चळवळी व व्यक्तीचा सहवास महत्त्वपूर्ण ठरला आहे.
3. समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी गोपीनाथराव मुंडे यांनी विधानसभेत महत्त्वपूर्ण विषय उपस्थित केले आहेत.
4. गोपीनाथराव मुंडे यांनी सामाजिक हितांच्या दृष्टिकोणातून सभागृहांच्या निदर्शनास आणलेल्या प्रश्नाची दखल शासनाला घ्यावी लागली आहे.
5. गोपीनाथराव मुंडे यांनी विविध विषया संदर्भात घेतलेल्या निर्णयांचा फायदा जनतेला झाला आहे.
6. समाज व्यवस्थेच्या उभारणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या शेतकरी, भूमिहिन, कामगार, शेतमजून इत्यादीचे प्रश्न व समस्या सोडवण्यासाठी सतत सक्रिय राहिले आहेत.

संशोधन पध्दती :–

सामाजिक शास्त्रातील संशोधनासाठी तथ्य संकलनाच्या अनेक पध्दती आहेत. "प्रस्तुत अभ्यासासाठी संशोधकाने माहिती संकलनातील प्राथमिक व दुय्यम स्त्रोता बरोबर वर्णनात्मक सांख्यिकीय व विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात येत आहे"[7]

संशोधन आराखडा :–

प्रस्तुत संशोधकाने "गोपीनाथराव मुंडे यांच्या राजकीय कर्तृत्वाचा विश्लेषणात्मक अभ्यास" या विषयाची मांडणी पुढील प्रकरणाच्या आधारे केली आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

या प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधकाने विषयाची समस्या, संशोधनाचे महत्त्व, उद्दिष्टे, गृहितके, संशोधन पध्दती, तथ्य संकलन इत्यादी संकल्पनाचा आढावा दिला आहे.

प्रकरण दुसरे : गोपीनाथराव मुंडे यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमिचा आढावा.

प्रस्तुत प्रकरणात गोपीनाथराव मुंडे यांच्या कौटुंबिक परिस्थिती बरोबर बालपणाचा लेखा–जोखा यांचा आढावा घेण्याचे योजीले आहे.

प्रकरण तिसरे : गोपीनाथराव मुंडे यांच्या राजकीय नेतृत्वाची वैचारिक जडण–घडण.

गोपीनाथराव मुंडे यांचे राजकीय नेतृत्व विकसीत होण्यास ज्या घटना प्रभावी ठरल्या त्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. यात विद्यार्थी परिषद, विद्यार्थी आंदोलन, मराठवाडा विकास आंदोलन, आणीबाणी, मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जनसंघातील विविध व्यक्तिमत्त्वाचा लेखा–जोखा या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : गोपीनाथराव मुंडे यांनी विधानसभेत बजावलेली भूमिका.

प्रस्तुत प्रकरणात 1980 ते 2009 प्रर्यंत (14 मार्च 1995 ते 14 सप्टेंबर 1999) हा कालावधी वगळता महाराष्ट्र विधानसभेत विधानसभा सदस्य म्हणून पार पाडलेल्या कामकाजातील सहभागाचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : 14 मार्च 1995 ते 14 सप्टेंबर 1999 या युतीशासनाच्या कारकिर्दीत उपमुख्यमंत्री म्हणून पार पाडलेले कार्य आणि कर्तृत्व.

प्रस्तुत प्रकरणामध्ये युतीशासनाच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री (गृह, ऊर्जा, पाटबंधारे, अर्थ) म्हणून संबंधित खात्याचा कार्यभार सांभाळत असतांना घेतलेल्या निर्णयाचा लाभ जनतेला झाला काय ? यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे : राष्ट्रीय राजकारणातील भूमिका.

या प्रकरणामध्ये 2009 ते जून 2014 पर्यंत राष्ट्रीय राजकारणात प्रवेश केल्यानंतर गोपीनाथराव मुंडे यांची लोकसभेत काय भूमिका राहिली आहे. यांचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण सातवे : समारोप आणि निष्कर्ष.

टिप *:* Synopsis *हा कमीत कमी शब्दा मध्ये बनवला असून यात आणखी पुष्कळ घटकांना स्पर्श करता आला असता परंतु यांचा आढावा नंतर घेण्यात येणार आहे.*

संदर्भ :–

1. श्रीकांत जोशी, योध्दा, प्रकाशक, आर,टी, देशमुख, अध्यक्ष भारतीय जनता पार्टी, द्वारा प्रकाशित बीड. 23 एप्रिल 2009
2. अनरूद्र नरहरी शिंदे, संघर्षयात्रा, ओम प्रकाशक अकलुज द्वारा प्रकाशित
3. बाहुसाहेब कुऱ्हाडे, योध्दा, संपादक श्यामसुंदर सोन्नर
4. प्रा. राम कापसे, तरूण भारत, 12 डिसेंबर 2003
5. श्रीकांत जोशी, योध्दा, प्रकाशक, आर,टी, देशमुख, अध्यक्ष भारतीय जनता पार्टी, द्वारा प्रकाशित बीड. 23 एप्रिल 2009
6. डॉ. उपेंद्र मा. कोठेकर, महाराष्ट्र टाईम्स 9 डिसेंबर 2001
7. पु. ल. भांडारकर सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर 1987